**A.B.N.No. 148/2017**

दावा दाखल तारीख  ०६-०६-२०१७
दावा नोंदणी तारीख  ०६-०६-२०१७
दावा निकाल तारीख १७-०७-२०१८
कालावधी :वर्षे ०१महिने ०१ दिवस ११

**<u>सहकार न्यायालय, श्रीरामपूर यांचे न्यायालयात</u>**

(पीठासीन अधिकारी  श्रीमती ए. जे. पाटील.)

ल.मु.नं. १४८/२०१७.
निशाणी क्र. ३५

यशवंत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित
तर्फे व करिता असिस्टंट मॅनेजर
श्री.शरद हरिभाऊ परभळे,
वय-३५ वर्षे, धंदा-नोकरी
रा.श्रीरामपूर  जि.अहमदनगर -- वादी

विरुध्द

१) खलील सुन्नाभाई शेख
वय-४४ वर्षे, धंदा- फर्निचर
रा. सुभेदार वस्ती, वॉर्ड नं.२
श्रीरामपूर ता. श्रीरामपूर
जि.अहमदनगर

२) शब्बीर आब्बास शेख
वय- ६६ वर्षे, धंदा- सेवानिवृत्त
रा. हफिज मस्जिद मार्केट यार्ड,
घर नं.८८, वॉर्ड नं.६, श्रीरामपूर
ता. श्रीरामपूर जि.अहमदनगर

३) महंमद आकील सुन्नाभाई शेख
वय-५३ वर्षे, धंदा- वखर
रा. मिल्लतनगर, वॉर्ड नं.१
श्रीरामपूर ता. श्रीरामपूर
जि.अहमदनगर -- प्रतिवादी

<u>दावा रक्कम रुपये २२,२३,५६७/- वसुलीसाठी</u>

वादीतर्फे - ॲडव्होकेट - श्री. पी.आर.जगधने
जाबदेणार क्र. १ : विनाकैफीयत
जाबदेणार क्र. २ व ३ : एकतर्फा.

# निकालपत्र

(दिनांक १७/०७/२०१८)

१. वादी संस्था ही महाराष्ट्र सहकार कायदा १९६० मधील तरतुदीनुसार नोंद झालेली सहकारी संस्था आहे. तिचा मुख्य उद्देश की तिचे गरजू सभासदांना त्यांच्या मागणीनुसार वेगवेगळया प्रकारची कर्जे मंजूर करणे असा आहे.

२. प्रतिवादी क्रमांक १ ते ३ हे वादी संस्थेचे सभासद आहेत. प्रतिवादी क्र. १ यांनी वादी कडून दिनांक ०६/१०/२०१५ रोजी रक्कम रुपये २०,००,०००/- चे कर्ज घेतले. त्या कर्जास इतर प्रतिवादी क्रमांक २ व ३ हे जामिनदार आहेत. या कर्जासाठी प्रतिवादीनी संबंधित असलेले सर्व करार व कागदपत्रे लिहून व सही करुन वादी संस्थेस दिले आहे. तसेच सदर कराराप्रमाणे कर्ज रक्कम ठरलेल्या व्याजासह परतफेड करण्याचे कबूल केले आहे.

३. तथापि प्रतिवादींनी लिहून दिलेल्या करारानुसार कर्ज रक्कमेची परतफेड केली नाही तसेच वादीनी वारंवार मागणी करुन देखील कर्ज रक्कम परतफेड केली नाही. त्यामुळे रक्कम वसुली करिता वादींना प्रस्तुत दावा दाखल करणे भाग पडले.

४. प्रतिवादींना कोर्ट समन्सची योग्यरित्या बजावणी होऊनही प्रतिवादी क्र. २ व ३ या कोर्टापुढे हजर झाले नाहीत. समन्स स्थळप्रत दाव्यामध्ये नि. ६ ते ८,१६,१७ ला आहेत. प्रतिवादी क्र.२ व ३ चे विरुद्ध एकतर्फा हुकूम पारित करणेत आला. प्रतिवादी क्र. १ या कामात हजर होऊन देखील कैफियत दाखल न केलेमुळे त्यांच्या विरुद्ध विना कैफियत आदेश पारीत करणेत आला. प्रतिवादीं क्र.१ चा प्रस्तुत विनाकैफीयत आदेश रद्द करणेचा अर्ज कॉस्टसह मंजूर करणेत आला. मात्र प्रतिवादींने कॉस्टची रक्कम वादीस मुदतीत न दिल्याने विनाकैफीयत आदेश कायम करण्यात आला. तसेच प्रतिवादी क्र. १ यांचे विरुध्द उलट तपास नसल्याचा आदेश व पुरावा नसल्याचा आदेश पारित होऊन प्रस्तुत दावा पुढे चालविणेत आला.

५. अशा प्राप्त परिस्थितीत वादींनी पुराव्याच्या दृष्टीने त्यांचे अधिकारी श्री. शरद हरीभाऊ परभळे यांचे शपथेवरील सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि. २२ वर दाखल केले. त्यातील कथनांपुष्टयर्थ कर्जासंबंधीत

सर्व मुळ कागदपत्रे दाखल केले आहेत. नि. २३ ठराव, नि. २४ कर्ज मागणी अर्ज, नि. २५ वचनचिठ्ठी, नि. २६ वैयक्तिक कर्ज करारनामा, नि. २७ कर्जरोखा, नि. २८ नजर गहाणखत, नि. २९ ते ३२ वकील नोटीस व पोहोच, नि. ३३ कर्ज खाते उतारा नक्कल यासर्व कागदपत्रांवरुन प्रतिवादींनी कर्ज रक्कम स्विकारल्याचे दिसून येते. प्रतिवादींना न्यायिक संधी देऊनही वादींचा तोंडी अगर कागदी पुरावा त्यांनी आव्हानीत न केल्यामुळे अबाधित राहिला आहे.

६. वरील सर्व पुरावा तपासुन पाहिला असता प्रतिवादींनी कर्ज रक्कम परतफेडीस कसुर केल्याचे स्पष्ट व सिद्ध होत आहे.

७. वादींनी प्रतिवादीस कर्ज रक्कम दिलेचे सर्व कागदपत्रांवरुन शाबित होत असल्यामुळे शिल्लक रक्कम वसुल करणेचा वादींना कायदेशीर अधिकार आहे. वादींनी दावा अर्जीत रक्कम रुपये २२,२३,५६७/- ची मागणी केली आहे आणि नि. ३३ कर्ज खाते उताऱ्यानुसार रक्कम रुपये २२,२३,५६७/- येणेबाकी दिसून येते. तसेच त्या रकमेवर दिनांक ०१/०४/२०१७ पासून १८ टक्के व्याजाची मागणी तसेच प्रतिवादी क्र.१ व २ यांनी तारण दिलेली मालमत्ता विकून कर्जाची वसुली होणे व इतर खर्चाची मागणी केलेली दिसून येते.

८. दावा रक्कमेबाबत वादीचा वर नमुद तोंडी व लेखी पुरावा तपासला असता वादींनी संस्था नोटीस, वकील नोटीस अशा अवास्तव व योग्य पुराव्या अभावी अयोग्य रक्कमा रुपये ६५०/- इतक्या प्रतिवादींवर लादल्या आहेत. सबब त्या रक्कमा वजा जाता उर्वरित रक्कम रुपये २२,२२,९१७/- शाबित केले आहेत. तसेच वचनचिठ्ठी / कर्जरोखा प्रमाणे वादी द.सा.द.शे १६% प्रमाणे दिनांक ०१/०४/२०१७ पासून पुढे व्याज घेणेस पात्र आहे. वादीचे खाते उतारेचे परिक्षण करता असे दिसून येते की, प्रतिवादींनी वेळोवेळी जमा केलेल्या रकमा वादींनी व्याजासह मुद्दलात जमा केल्या आहेत. सबब खाते उताऱ्यात दिसणाऱ्या कमीत कमी शिल्लक बाकीच्या मुद्दल रकमेवर उभयंतामध्ये ठरलेल्या दराने व्याज वसुली वादीस पात्र आहे.

९. वर नमुद सर्व कारणास्तव मी खालीलप्रमाणे हुकूमनामा मंजूर करीत आहे.

**आदेश**

१) दावा खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी वैयक्तिक व संयुक्तिकरित्या रक्कम रुपये २२,२२,९१७/- इतकी वादीस द्यावी. तसेच रक्कम रुपये १९,१२,९६७/- इतक्या मुद्दलावर द.सा.द.शे. १६% प्रमाणे (नि. २६ अनुसार) दर तिमाही व्याजदराने दिनांक ०१/०४/२०१७ पासून संपूर्ण निवाडा रक्कम फिटेपर्यंत व्याजाने वादी यांना देणेचा आदेश करणेत येत आहे.

३) वादी, प्रतिवादी अवार्ड प्रमाणे रक्कम भरण्यास/देण्यास असमर्थ ठरल्यास प्रतिवादीच्या गहाण मिळकतीतून वसुल करण्यास पात्र आहे.

४) प्रतिवादींनी वादींना दाव्याच्या खर्चाची रक्कम द्यावी व स्वतःचा खर्च स्वतः सोसावा.

५) येणेप्रमाणे हुकूमनामा करणेत यावा.

( ए. जे. पाटील)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, श्रीरामपूर

श्रीरामपूर
दिनांक : १७/०७/२०१८.

**A.B.N.No. 148/2017**

दावा दाखल तारीख ०६-०६-२०१७
दावा नोंदणी तारीख ०६-०६-२०१७
दावा निकाल तारीख १७-०७-२०१८
कालावधी :वर्षे ०१महिने ०१ दिवस ११

**सहकार न्यायालय, श्रीरामपूर यांचे न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी श्रीमती ए. जे. पाटील.)

ल.मु.नं. १४८/२०१७.
निशाणी क्र. ३६

यशवंत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित
तर्फे व करिता असिस्टंट मॅनेजर
श्री.शरद हरिभाऊ परभळे,
वय-३५ वर्षे, धंदा-नोकरी
रा.श्रीरामपूर जि.अहमदनगर -- वादी

विरुध्द

१) खलील सुन्नाभाई शेख
वय-४४ वर्षे, धंदा- फर्निचर
रा. सुभेदार वस्ती, वॉर्ड नं.२
श्रीरामपूर ता. श्रीरामपूर
जि.अहमदनगर

२) शब्बीर आब्बास शेख
वय- ६६ वर्षे, धंदा- सेवानिवृत्त
रा. हफिज मस्जिद मार्केट यार्ड,
घर नं.८८, वॉर्ड नं.६, श्रीरामपूर
ता. श्रीरामपूर जि.अहमदनगर

३) महंमद आकील सुन्नाभाई शेख
वय-५३ वर्षे, धंदा- वखर
रा. मिल्लतनगर, वॉर्ड नं.१
श्रीरामपूर ता. श्रीरामपूर
जि.अहमदनगर -- प्रतिवादी

दावा रक्कम रुपये २२,२३,५६७/- वसुलीसाठी

वादीतर्फे - ॲडव्होकेट - श्री. पी.आर.जगधने
जाबदेणार क्र. १ : विनाकैफीयत
जाबदेणार क्र. २ व ३ : एकतर्फा.

## हुकूमनामा

दिनांक ०६/०६/२०१७ रोजी दाखल केलेल्या वरील वादाचा दि. १७/०७/२०१८ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९६ अन्वये दिलेल्या निकालाप्रमाणे प्रस्तुत वाद खालीलप्रमाणे निकाली करणेत येत आहे.

१) दावा खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी वैयक्तिक व संयुक्तिकरित्या रक्कम रुपये २२,२२,९१७/- इतकी वादीस द्यावी. तसेच रक्कम रुपये १९,१२,९६७/- इतक्या मुद्दलावर द.सा.द.शे. १६% प्रमाणे (नि. २६ अनुसार) दर तिमाही व्याजदराने दिनांक ०१/०४/२०१७ पासून संपूर्ण निवाडा रक्कम फिटेपर्यंत व्याजाने वादी यांना देणेचा आदेश करणेत येत आहे.

३) वादी, प्रतिवादी अवार्ड प्रमाणे रक्कम भरण्यास/देण्यास असमर्थ ठरल्यास प्रतिवादीच्या गहाण मिळकतीतून वसुल करण्यास पात्र आहे.

४) प्रतिवादींनी वादींना दाव्याच्या खर्चाची रक्कम द्यावी व स्वतःचा खर्च स्वतः सोसावा.

| तपशिल | कोर्ट फी स्टॅम्प | अनामत (डिपॉझिट) | इतर | एकुण |
|---|---|---|---|---|
| वादी | २७७४०/- | -- | -- | २७७४०/- |

आज दिनांक १७/०७/२०१८ रोजी हा निवाडा माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला आहे.

(ए. जे. पाटील)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, श्रीरामपूर

श्रीरामपूर
दिनांक : १७/०७/२०१८.